# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक १२ मार्च २०१३.
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : म.वि.प.नियम ९३ अन्वये सूचना (असल्यास).**

**तीन : लक्षवेधी सूचना-(म.वि.प. नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्री. संजय दत्त, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री. चरणसिंग सप्रा, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती अलका देसाई, श्री. सुभाष चव्हाण, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री. जयवंतराव जाधव,**
**विक्रम काळे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. किरण पावसकर, अनिल भोसले, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.अपूर्व हिरे, सर्वश्री. प्रकाश बिनसाळे, नरेंद्र पाटील, राणा जगजितसिंह पाटील, दिपकराव साळुंखे वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गॅस सिलिंडरपासून शाळेतील प्रवेशापर्यंत सर्वत्र आधार कार्डाची असलेली सक्ती, निवृत्तीवेतनासाठी, भविष्य निर्वाह निधीसाठी, तसेच, विद्यापीठांमधील शिष्यवृत्तीधारकांसाठी आवश्यक होणार असणे, आधार कार्ड नोंदणीसाठी राज्यशासनाने मोहिम राबविली असली तरी अपुरी नोंदणी केंद्रे, आवश्यक यंत्रांची कमतरता, काही ठिकाणी अननुभवी कर्मचारी, नोंदणी नंतर चार ते सहा महिन्यांची प्रतिक्षा, चौकशीसाठी दिलेला फोन क्रमांक कायम व्यस्त असणे, केंद्रात गेल्यावरही आवश्यक माहिती न मिळणे, कर्मचाऱ्यांचा उर्मटपणा, जेष्ठ नागरिक व अपंग व्यक्तीना आधार कार्ड काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात समस्या येणे, जनजागृतीअभावी विभागात आधारकार्ड नोंदणी केंद्र कुठे आहे याचीच माहिती अनेकांना नसणे, अनेक तास रांगेत उभे राहूनही योग्य ती कागदपत्र नसल्याने अनेकांना परत जावे लागणे, राज्यात आतापर्यंत झालेल्या ३.८६ कोटी नोंदणीपैकी सव्वापाच लाख कार्ड केवळ पत्ता सापडत नसल्याने पोस्टाने परत गेली असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

(२) **सर्वश्री. विनायक राऊत, विजय सावंत, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कुडाळ तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) पणदुर-मयेकरवाडी आणि डीगस-सुर्वेवाडीत दिनांक २३ फेब्रुवारी, २०१३ रोजी वा त्या दरम्यान मध्यरात्री ३ च्या सुमारास ३ उन्मत जंगली हत्तींनी हैदोस घालून श्री. बी. बी. सावंत यांचे संपूर्ण घर उध्वस्त करुन मालमत्तेचे अतोनात नुकसान करणे, पणदुर-मयेकरवाडी व डीगस-सुर्वेवाडी परिसरात ग्रामस्थांना जंगली हत्ती, गवे व रेडे यांचा नियमीत होणारा त्रास, त्यातून ग्रामस्थांच्या बागा व शेती उध्वस्त होण्याच्या सर्रास घडत असलेल्या घटना, ग्रामस्थांनी गवे, रेडे व हत्ती यांचा बंदोबस्त करावा म्हणून वनक्षेत्रपाल कडावल वनविभाग यांच्याकडे वारंवार मागणी करुनही वनक्षेत्रपालांनी सुरक्षिततेचे उपाययोजना न करणे, परिणामी ग्रामस्थांत व शेतकरी वर्गात वाढते भितीचे, असुरक्षिततेचे व चिंतेचे वातावरण, शासनाने तातडीने जंगली हत्ती, गवे, रेडे यांचा बंदोबस्त करण्यासाठी करावयाची उपाययोजना."

(३) **श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"बुलढाणा जिल्ह्यातील महत्त्वाकांक्षी जिगांव प्रकल्पाचे कामी 'पहिले पुनर्वसन मग धरण' या शासनाच्या संकल्पनेला बगल देण्यात येणे, पुनर्वसनासंदर्भात कोणतीही ठोस भूमिका शासनाच्यावतीने घेण्यात येत नसल्याची मार्च, २०१३ मध्ये उघडकीस आलेली घटना, या कामाच्या खोदकामात ब्लास्टिंग करताना करण्यात येणाऱ्या विस्फोटांमुळे परिसर हादरुन आजुबाजुच्या घरांची होणारी पडझड, प्रकल्पावर सुरु असणाऱ्या वर्दळीसाठी वापरण्यात येणाऱ्या मार्गावरील अवजड वाहने, जेसीबी कंटेनर, टिप्पर, इत्यादीसह मोठ्या क्रेनच्या वाहतुकीमुळे होत असलेले अपघात, या प्रकल्पाच्या कामात भिंतीमध्ये काळ्यामातीऐवजी पिवळ्या मातीचा तसेच रेतीचा वापर करण्यात येणे, परिणामी भविष्यात या भिंतीमधून साठविलेले पाणी पाझरुन जाण्याची शक्यता, याकडे प्रशासनाचे होणारे दुर्लक्ष, प्रकल्पग्रस्त नागरिकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, जिगांव प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुनर्वसन होण्याबाबत, शासनाने करावयाची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका.

(४) **श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"महाराष्ट्र राज्य पाठपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे, यांच्यामार्फत सर्व

शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तक योजनेतून जिल्हा परिषदेच्या शाळांना वाटप करण्यात आलेल्या पुस्तकांपैकी तिसरीच्या बालभारती (मराठी) पुस्तकातील तब्बल चाराधडे गायब झाल्याचे तर १६ पाने पुनर्मुद्रित करण्यात आल्याचे आढळून येणे, तसेच राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यामिक मंडळाच्या इयत्ता नववीच्या सामाजिकशास्त्र पुस्तकाच्या नव्या आवृत्तीत इतिहास आणि राज्यशास्त्राशी निगडीत अनेक चुका असल्याचे निदर्शनास येणे, शुध्दलेखन आणि काही संकल्पनांबाबत चुका असुन एका प्रकरणातील राष्ट्रध्वजावर अशोकचक्राचे चित्रच नसणे तसेच, सीबीएसईच्या दहावीच्या अभ्यासक्रमातील विज्ञानाच्या पुस्तकात तब्बल ५० चुका असल्याचे निदर्शनास येणे, या पुस्तकांची निर्मिती करतांना विद्यार्थ्यांकडे स्वत:ची जाणीव, निर्णयक्षमता, समस्या निराकरण, परिणामकारक संप्रेषण, सृजनशील व चिकित्सात्मक विचार ही उद्दिष्टे समोर ठेवून पुस्तकांची रचना केली असतांना शुध्दलेखन व संकल्पना मधील तसेच मुद्रक आणि बांधणीतील अक्षम्य चुकांमुळे विद्यार्थ्यांच्या माथी सदोष पुस्तके मारण्यात येणे, या चुकांबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**चार : विशेष उल्लेख (असल्यास).**

## मध्यंतर

**पाच : शासकीय विधेयक**

**पुर:स्थापनार्थ :-**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१३.

**सहा : म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

(१) **श्री.दिपकराव साळुंखे, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री.हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, राणा जगजितसिंह पाटील, सुभाष चव्हाण, सतिश चव्हाण, एम.एम.शेख, रमेश शेंडगे, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री, संदीप बाजोरिया, जयप्रकाश छाजेड, विनायक मेटे, संजय दत्त, जयवंतराव जाधव, अशोक ऊर्फ भाई जगताप, किरण पावसकर, ॲड.जयदेवराव गायकवाड वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

" राज्यात निर्माण झालेली भीषण दुष्काळी परिस्थिती, राज्यातील १२००० गावे दुष्काळाच्या छायेत असणे, १९७२ च्या दुष्काळापेक्षा यावेळची दुष्काळी परिस्थिती भयानक असणे, बँकेकडून व खाजगी सावकाराकडून कर्ज काढून शेतकऱ्यांनी पेरणी करणे, राज्यातील बऱ्याच भागात पावसाअभावी शेतीमालाच्या उत्पादनात झालेली घट, त्यामुळे शेतकरी हवालदिल होणे, राज्यात उद्‌भवलेली तीव्र पाणी टंचाई, काही भागात १० दिवसातून एकदा पाणी पुरवठा करण्यात येणे, सध्या १२०५ गावातील ३७८९ वाड्यांना सुमारे २००० च्यावर टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येणे, ही संख्या वाढण्याची निर्माण झालेली परिस्थिती, पाण्यासाठी महिलांना व लहान मुलांना वणवण भटकावे लागणे, केंद्र शासनाची असलेली आरआरआर ही योजना प्रभावीपणे राज्यात राबविण्याची आवश्यकता, पाणी व चाऱ्या अभावी जनावरांचे होत असलेले हाल, शेतकऱ्यांना स्वतःची जनावरे अत्यल्प किंमतीत बाहेरील राज्यात विकावे लागणे, राज्यात ४२० चारा छावण्या असणे, सर्वाधिक छावण्या अहमदनगर, सोलापूर व सातारा जिल्ह्यात असूनही त्या अपुऱ्या असणे, बीड जिल्ह्यात बीड व आष्टी व्यतिरिक्त गेवराई तालुक्यात त्याचप्रमाणे, जळगाव व नाशिक जिल्ह्यात मागणी असूनही तेथे चारा छावण्या उभारण्यात न येणे, चारा छावण्या उभारण्याच्या निकषात बदल करण्याची आवश्यकता, शेळया व मेंढ्यांसाठी राज्यात एकही चारा छावणी नसणे, वन्यप्राण्यांसाठी जंगलात सिमेंटच्या टाक्या बांधून त्यात टँकरने पाणीपुरवठा करण्याची आवश्यकता, दुष्काळग्रस्त भागातील लोकांना रोजगार हमी योजनांची कामे मिळत नसल्यामुळे ते मुंबई, ठाणे व पुणे या भागात स्थलांतरीत होणे, रोजगार हमी योजनांची कामे मोठ्या प्रमाणात सुरु करण्याची त्याचप्रमाणे भविष्यकालीन उपाययोजनांवर भर देण्याची नितांत आवश्यकता, फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यांच्यासाठी स्वतंत्र पॅकेज देण्याची होत असलेली मागणी, शेतकऱ्यांच्या कर्ज वसुलीस स्थगिती देण्याचा व वीज बिलात सवलत देण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, या भीषण दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी त्याचप्रमाणे पाणी टंचाईवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेवून दुष्काळग्रस्त भागातील नागरीकांना तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

**सात अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये- (बैठकीच्या शेवटी)**

(१) **श्री.विक्रम काळे, वि.प.स.**

"राज्यातील भूविकास बँकेचे पुनरुज्जीवन करण्याबाबत" या विषयावरील श्री.दिपकराव साळुंखे, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४०५१ ला दिनांक ११/१२/२०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

(२) **डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.**

"मंत्रालयास लागलेल्या भीषण आगीनंतर शासनाने केलेल्या उपाययोजनेबाबत" या विषयावरील श्री.प्रविण पोटे पाटील, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३४३३३ ला दिनांक १८/१२/२०१२ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

| | |
|---|---|
| **विधान भवन,** | **डॉ.अनंत कळसे,** |
| मुंबई, | प्रधान सचिव, |
| दिनांक : ११ मार्च, २०१३. | महाराष्ट्र विधानपरिषद. |